राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ३५४८ / २०२३ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विश्वनाथ खंडू अंबपकर | ग्रामसेचक, मोजे संभाजीपुर ता .शिरोळ जि . कोल्हापूर | विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती ता. शिरोळ , जि . कोल्हापूर |

( सुनावणी दिनांक - १८ /०२ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १९.०६.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१७.०४.२०२३ च्या माहिती अर्जात संस्थेतील सभासदांच्या असेसमेंट उताऱ्याबाबत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीच्या माहिती अर्जास तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असून माहिती पुरविण्यास १५ दिवसाची जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली मुदत मान्य करुन दि.२९/५/२०२३ च्या अर्जाप्रमाणे शासन परिपत्रक दि.१/२/२०१७ २ मधील मु.क्र.१३ नुसार कार्यवाही करावी असे आदेशीत केले.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झालेले नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) नुसार याप्रकरणी वर्तमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, शिरोळ ता. शिरोळ जि. कोल्हापूर यांना जन माहिती अधिकारी घोषीत करण्यात येत आहे, त्यांना आदेशित करण्यात येते की, यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी. जी माहिती देत येत नाही, त्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीस कळवावे. सदर आदेशाची अंमलबजावणी संबधित अधिकारी यांनी विहिती कालावधीत करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३५४८ / २०२३ / कोल्हापूर / 43 24 / 2025 दिनांक - 6/3/2025